# लोकल ट्रेन प्रवाशांच्या सातत्यपूर्ण मोहिमेत सामील व्हा व मोहिम मजबूत करा!

कामगार एकता कमिटी और कळवा-मुंब्रा रेलवे प्रवासी सुरक्षा संघर्ष समितीचे आवाहन, एप्रिल-मे 2026

**नागरिकांनो!**

आपल्यापैकी अनेकांना माहीत आहे की, कळवा-मुंब्रा रेल्वे प्रवासी सुरक्षा संघर्ष समितीची स्थापना ऑक्टोबर २०२५ मध्ये कामगार एकता कमिटीने केली. त्या दिवसापासून आजपर्यंत आम्ही अनेक महिन्यांपासून सातत्यपूर्ण जनआंदोलन राबवत आहोत, ज्यामध्ये स्थानिक प्रवाशांच्या अडचणी तसेच त्यांच्या मागण्या मांडल्या आहेत.

आम्ही मोठ्या प्रमाणावर मोर्चे काढले; नगरसेवकांपासून ते खासदारांपर्यंत विविध स्तरांवरील निवडून आलेल्या प्रतिनिधींना भेटण्याचा प्रयत्न केला आणि काहींची भेट घेतली. तसेच डीआरएमपासून स्टेशन मास्टरपर्यंत रेल्वे अधिकाऱ्यांना आपली मागणीपत्रे दिली. अनेक वेळा स्मरणपत्रेही दिली. आम्ही अनेक पत्रके (leaflets) प्रकाशित केली आणि दरवेळी ती स्टेशनबाहेर, रस्त्यांवर तसेच घराघरांत जाऊन वाटली.

विकल्प वाणी व्हिडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा किंवा या लिंकला भेट द्या: https://www.youtube.com/watch?v=hAVzSSqBxjQ

आमच्या आंदोलनाला प्रसारमाध्यमांमध्येही प्रसिद्धी मिळाली. यात अक्षराज, मजदूर एकता लहर यांसारखी वृत्तपत्रे तसेच आर्टिकल 14 आणि विकल्प वाणी यांसारखे चॅनेल्स समाविष्ट आहेत.

आपल्या मागण्यांमध्ये सर्वसाधारणपणे लोकल सेवांमध्ये सुधारणा तसेच स्टेशन-विशिष्ट मागण्या होत्या. सातत्यपूर्ण प्रयत्नांनंतर आपण कळवा स्टेशनशी संबंधित काही मागण्या मान्य करून घेण्यात यशस्वी झालो. मात्र, रुग्णवाहिका, स्ट्रेचर, स्ट्रेचर हमाल आणि आपत्कालीन वैद्यकीय कक्ष यांसारख्या अत्यावश्यक मागण्या अजूनही पूर्ण झालेल्या नाहीत.

सर्वात तातडीची मागणी त्या हजारो प्रवाशांमध्ये जोरदारपणे उमटली, ज्यांच्याकडे कामावर आणि शिक्षणासाठी जाताना कारशेड गाड्यांमध्ये चढण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. आपली मागणी होती: **"जोपर्यंत होम प्लॅटफॉर्म तयार होत नाही आणि प्रवाशांना कळवा स्टेशनवरून गाडीत चढता येत नाही, तोपर्यंत भिंत बांधू नका!"**

ठाणे महानगरपालिका निवडणुकांच्या वेळी ही मागणी गंभीर मुद्दा बनवण्यात आपण यशस्वी झालो आणि आतापर्यंत भिंत बांधण्यास थांबवले. मात्र, हजारो प्रवासी, त्यांच्या कुटुंबीयांचा आणि जागरूक नागरिकांचा पाठिंबा असूनही भिंत बांधली जाणार नाही याची काही खात्री नाही.

एक गोष्ट स्पष्ट आहे—संपूर्ण मुंबई उपनगरीय लोकल नेटवर्कमध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा आवश्यक आहे. हे मोठे काम आहे आणि तेव्हाच शक्य होईल जेव्हा हजारो लोक या आंदोलनात सहभागी होतील. आम्ही खालील मागण्यांसाठी हे आंदोलन अधिक व्यापक करणार आहोत:

- प्रत्येक लोकल ट्रेनमध्ये किमान १५ डबे असावेत. (खरं तर RDSO [भारतीय रेल्वेची संशोधन रचना आणि मानकीकरण संस्था] ने 2008-2009 मध्येच 18-कार लोकल गाड्यांना तांत्रिक मान्यता दिली होती!)

- लोकल गाड्यांची वारंवारता (frequency) किमान ५०% ने वाढवावी. नवीन सिग्नलिंग प्रणाली बसवून हे सहज शक्य आहे, जसे मेट्रोसाठी केले जाते. MRVC (मुंबई रेल्वे विकास महामंडळ) ने आधुनिक सिग्नलिंग प्रणालीचा प्रस्ताव दिला होता ज्यामुळे गाड्यांमधील अंतर 2.5 मिनिटांपर्यंत कमी करता येईल; मात्र प्रकल्पाला 2019 मध्ये MUTP-3A अंतर्गत मंजुरी मिळूनही काम पुढे सरकलेले नाही. वाढत्या प्रवासी भारासाठी मोटरमन, गार्ड इत्यादी आवश्यक रेल्वे कर्मचाऱ्यांची भरती करावी.

**आम्ही तुम्हाला पुन्हा आठवण करून देतो की लाखो लोकांच्या हिताच्या या मागण्या जिंकण्यासाठी, तुमच्यापैकी प्रत्येकाने मोहिमेत सामील होऊन आपापल्या परीने योगदान देणे आवश्यक आहे:**

- सर्व स्तरांवरील जनप्रतिनिधींना भेटून या मागण्या मांडण्यास भाग पाडा.
- आपल्या संघटना, युनियन, कॉलनी, सोसायटी, भजन मंडळ इत्यादींमध्ये पत्रकांचे वितरण आयोजित करा.
- मोहिमेच्या मागणीनुसार नाटके, गाणी, व्हिडिओ आणि रील्स तयार करा. मीडिया आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांना व्हायरल करा.
- यूट्यूब, इन्स्टाग्राम, ट्विटर इत्यादी माध्यमांतून या अभियानाचा प्रसार करा आणि ते व्हायरल करा.

**या संपूर्ण अनुभवातून आजच्या लोकशाहीबद्दल, ती कोणाची सेवा करते याबद्दल कटू धडे मिळतात:**

- सामान्य नागरिकांकडे त्यांच्या मागण्या सहजपणे जनप्रतिनिधींपर्यंत पोहोचवण्यासाठी कोणताही ठोस मार्ग नाही. त्यांना भेटणे आणि मागण्या मांडणे अत्यंत कठीण आहे.
- आपला आवाज उठवण्यासाठी आपल्याला एकत्र येऊन वेळ, पैसा आणि ऊर्जा खर्च करावी लागते.
- हजारो नागरिकांच्या आवाजाकडे लक्ष देणे आणि त्यांच्या योग्य मागण्या पूर्ण करणे यासाठी अधिकारी बांधील नाहीत.
- निवडणुकीपूर्वी आश्वासने दिली जातात, परंतु निवडणुकांनंतर ते त्यांच्या पक्षाच्या “हाय कमांड”नुसारच वागतात आणि आश्वासने विसरतात.
- दुसरीकडे, हजारो कोटींची संपत्ती असलेल्या मोठ्या भांडवलदारांना त्यांचे आदेश पाळण्यासाठी कोणत्याही प्रतिनिधीला भेटण्याची गरज नसते. त्यांच्या कर्मचाऱ्यांकडून फक्त “सूचना” दिल्या जातात आणि त्यांची अंमलबजावणी होते. हे आश्चर्यकारक नाही, कारण मोठे भांडवलदारच मोठ्या पक्षांना निधी पुरवतात आणि सरकारने तयार केलेल्या धोरणे व कायद्यांद्वारे आपले “गुंतवणूक” परत मिळवतात.

**सर्वात महत्त्वाचा धडा असा आहे की, आपल्या समस्या सोडवण्यासाठी आणि माणूस म्हणून सन्मानाने जगण्यासाठी आपल्याला भांडवलदारांच्या सत्तेऐवजी कामगारांची सत्ता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने संघर्ष करावा लागेल!**

हेच आमचे उद्दिष्ट आहे! आमच्यात संगठनेत सहभागी व्हा आणि आपल्या दीर्घकालीन उद्दिष्ट लक्षात ठेवून लोकल रेल्वे सेवांच्या सुधारणेसाठीच्या या आंदोलनात सामील व्हा!

**संपर्क:** 7208388230 / 9820119317

कळवा-मुंब्रा रेल्वे प्रवासी सुरक्षा संघर्ष समिती व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये सामील होण्यासाठी QR कोड स्कॅन करा